# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with **'A'** Grade





## ACADEMIC (Affiliation) SECTION

**Phone: (02462) 229242 / 43**
**Fax : (02462) 229245 / 229325**
**Website: www.srtmun.ac.**
**E-Mail ID: affi.srtmun@gmail.com**


जा.क्र. शैक्षणिक / संलग्न / ०३ / २०१५–१६ / 1609

दि. ~~३१ / १० / २०१५~~
02 - 11

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व (अव्यावसायिक) संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

विषय : व्यावसायिक माहिती प्रणाली (एम. आय. एस.) सन २०१५–१६ वेबपोर्टलवर माहिती भरणे बाबत.

संदर्भ : क्र. उशिस / सांख्यिकी / एमआयएस / २०१५–१६ / ११०२२ दिनांक २९ / १० / २०१५ चे शिक्षण संचालनालयाचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणस कळविण्यात येते की, व्यवस्थापन माहिती प्रणालीच्या माध्यमातुन ऑनलाईन पध्दतीने शैक्षणिक वर्ष सन २०१५–१६ मध्ये एम. आय. एस. माहितीची नोंदणीची सोय वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देवून आपल्या महाविद्यालयाची माहिती वेबपोर्टलवर भरण्याबाबत आपल्याला कळविण्यात आले होते. तरीही अद्याप काही महाविद्यालयांनी माहिती वेबपोर्टलवर नोंदविलेले नाही.

संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी शैक्षणिक व इतर बाबींची सन २०१५–१६ या वर्षाकरीताची माहिती दिनांक १० / ११ / २०१५ पर्यंत www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टलवर तात्काळ भरावयाची आहे. **सदरची माहिती वेळेत न भरल्यास संपुर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या नोडल अधिकारी तथा प्राचार्यांची राहील.**

माहिती भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपण stat.dhepune@nic.in या email किंवा **02462 - 229126** या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधवा. (सदरचे पत्र ज्या महाविद्यालयांनी माहिती वेबपोर्टलवर नोंदविलेली नाही अशा महाविद्यलयाकरीता आहे. )

कळावे.

**संचालक**
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत: माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:
सिस्टीम एक्सपर्ट, यु.जी.सी. कक्ष, यांना देवून कळविण्यात येते की, सोबत जोडलेले युजीसी परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)

मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१

फोन क्रमांक ०२० ६५००१०१६/६५००११७३

वेब - www.dhepune.gov.in

फॅक्स क्रमांक ०२०/२६१२११५३

ई-मेल - stat.dhepune@nic.in

क्रमांक उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०१५-१६/ 11022

दिनांक - २९.१०.२०१५

तातडीचे/महत्वाचे स्मरणपत्र क्रमांक - २

प्रति,

कुलसचिव,

१) मुंबई विद्यापीठ, मुंबई
२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
४) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
५) स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
६) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
७) कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
८) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
९) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
१०) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
११) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
१२) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
१३) डेक्कन पुरातत्वशास्त्र संशोधन संस्था, येरवडा पुणे
१४) डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे
१५) भारती विद्यापीठ, पुणे
१६) गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था, डेक्कन जिमखाना, पुणे
१७) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे

विषय - व्यवस्थापकीय माहिती पध्दत (एम.आय.एस.) सन २०१५-१६

वेबपोर्टलवर माहिती भरणे बाबत

संदर्भ - संचालनालयाचे समक्रमांकाचे दिनांक २८.९.२०१५ चे पत्र क्रमांक १४८३

उपरोक्त विषयाबाबत संचालनालयाचे वरील संदर्भिय पत्र पहावे. सदरील पत्रान्वये संचालनालयाने www.dhemis.maharashtra.gov.in ह्या वेबपोर्टलवर सन २०१५-१६ या वर्षाची सर्व विद्यापीठांनी विद्यापीठाशी संबंधित बाबींची आणि संलग्नित महाविद्यालयांनी त्यांच्याशी संबंधित बाबींची माहिती नोंदविण्याबाबत कळविण्यात आले आहे.

२. संचालनालयाने स्तरावर माहिती नोंदणीच्या कामाचा आढावा घेतला असता अदयाप आपल्या विद्यापीठामार्फत तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयांनी शैक्षणिक व इतर बाबींची माहिती वेबपोर्टलवर नोंदली नसल्याचे दिसून आले आहे. एमआयएस माहितीचा अहवाल दिनांक १०.११.२०१५ पर्यंत शासनाला सादर करावयाचा आहे. या दृष्टीने सर्व विद्यापीठांनी माहिती वेबपोर्टलवर त्वरित भरून पूर्ण करावी. तसेच संलग्नित महाविद्यालयांकडे नोडल अधिकारी मार्फत माहिती नोंदणीच्या कामाचा पाठपुरावा करून सर्व माहिती त्वरित भरून घ्यावी.

(डॉ.धनराज माने)

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य पुणे